महावितरण (TM)
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३६१९ (वै.)२६४७४७५३ फॅक्स : ०२२.२६४७२३६६

**क्र.मु.अ.(वा)/लेखा/ग्रां.प.दिवाबत्ती/५५/२००८-०९/** No 6978 **दिनांक :** 6 MAR 2009

**परिपत्रक क्र.** 92

**विषय :- ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. ५३,४०,८४०००/- (रुपये त्रैपन्न कोटी चाळीस लाख चौ-यार्एंशी हजार फक्त)**

संदर्भ :-१.शासन निर्णय क्र.बीजीटी २६०८/प्र.क्र.४४९८/पंरा-४(२२) दि.२० डिसेंबर २००८.
२.शासन शुध्दीपत्रक क्र.बीजीटी २६०८/प्र.क्र.४४९८/पंरा-४(२२) दि.१०.२.२००९.

--------------

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची देयके भागविण्यासाठी शासन १०० टक्के अनुदान देते. सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये १०६,८१,६८०००/- (रुपये एकशे सहा कोटी एक्याऐंशी लाख अडूसष्ट हजार फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आली आहे, पैकी रक्कम रुपये ५३,४०,८४०००/-(रु.त्रेपन्न कोटी चाळीस लाख चौ-याऐंशी हजार फक्त) वरील संदर्भिय शासन निणर्या सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला रोखीत प्राप्त झाले आहेत.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, संबंधित जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधितानी जरुर ती कार्यवाही करावी. तदवत शासन शुध्दीपत्रक (संदर्भ क्र.२) नुसार शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रात अ.क्र. ५ मध्ये अक्षरी "रुपये दोन कोटी अडुसष्ट लाख पन्नास हजार फक्त" याऐवजी "रुपये दोन कोटी शहाऐंशी लाख पन्नास हजार फक्त" असे वाचावे. तसेच अ.क्र.१३ मध्ये अंकात रुपये "३७७.१४" च्या ऐवजी "३७७.१५" आणि अक्षरी रुपये "तीन कोटी सत्यात्तर लाख चौदा हजार फक्त" च्याऐवजी " तीन कोटी सत्त्यात्तर लाख पंधरा हजार फक्त " असे वाचावे.

थकबाकीपोटी समायोजित करण्यात आलेल्या रकमेचे, (सन २००८-०९) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय- मुंबई -३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरीत पाठवावी.
सोबत :- वरीलप्रमाणे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

D:\Vaze\Acctts\acctts Circular ०९.doc

प्रत सविनय सादर -
१) संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, मुंबई.

प्रत सस्नेह रवाना -

१. सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालय, माहिती व उचित कार्यवाहीसाठी
२. मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा), म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, मुंबई.

प्रत रवाना -

१) सर्व अधिक्षक अभियंता, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित,
२) महा व्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), मुंबई.
३) सर्व कार्यकारी अभियंता, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित.
४) सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये
--- उचित कार्यवाहीसाठी.

अर्थसंकल्पीय अनुदान सन २००८-२००९

३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००- इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० % अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत)(मागणी क्र. एल -१)

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. बीजीटी २६०८/प्र.क्र. ४४१८ /पंरा-४(२२)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक- २० डिसेंबर, २००८.

वाचा :-१) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०९५/सीआर १९४०/२२ दि. ३०.१.९०

प्रस्तावना :-

ग्राम पंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात वित्त विभागाने एकूण रुपये १०६,८१,६८,००० ( रुपये एकशे सहा कोटी एक्क्याऐंशी लक्ष अडुसष्ट हजार फक्त ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

१) सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रु. १०६,८१,६८,००० ( रुपये एकशे सहा कोटी एक्क्याऐंशी लक्ष अडुसष्ट हजार फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

२. सदर तरतूदीतून या शासन निर्णयाव्दारे ग्रामपंचायतीमधील रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज देयके अदा करण्यासाठी तरतूद रक्कम रुपये ५३,४०,८४,०००/- ( रुपये त्रेपन्न कोटी चाळीस लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त ) इतके अनुदान सोबतच्या विवरणपत्रात जिल्हानिहाय दर्शविलेल्या विगतवारीप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई

कडे सुपूर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाद्वारे कार्यासन अधिकारी , रोखशाखा ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे . सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा धनादेश महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय , मुंबई येथून काढावयाचा आहे. कार्यासन अधिकारी , रोख शाखा यांच्या सहीने तयार केलेले व उप सचिव ( आस्थापना ) , ग्राम विकास व जलसंधारण विभाग , मंत्रालय, मुंबई यांनी प्रति स्वाक्षरीत केलेले देयक , अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यांत यावे. वरील मंजूर रक्कम रुपये ५३,४०,८४,०००/- ( रुपये त्रेपन्न कोटी चाळीस लाख चौ-याऐंशी हजार फक्त ) इतके अनुदान खालील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यांत येत आहे .

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम ,त्यांनी या शासननिर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या थकबाकीस अधिन राहून समायोजित करावी. व तसा अहवाल शासनास सादर करावा.

ब) समायोजित केलेल्या रकमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबईने ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबईने खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावी व याची एक प्रत शासनास पाठवावी. विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र. ३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या

खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

२. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून उपसचिव ( आस्थापना ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

४ या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत) (मागणी क्र. एल ५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

५ हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारिक संदर्भ क्र. ९१८/०८, अर्थ १७, दिनांक २०.८.२००८ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्र. वि. पाटील )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.( ३ प्रती )

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी,

१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१ (५ प्रती)

२) व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.

३) मुख्य अभियंता ( वाणिज्य ) , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड (वाणिज्य विभाग ) ५वा मजला , अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पू ) , मुंबई ४०० ०५१ (५ प्रती )

४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई ०१

५) महालेखापाल ( लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ०१

६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२ , नागपूर .

७) महालेखापाल ( लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२ , नागपूर .

८)निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

९) निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

१०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.

११) उप मुख्य लेखा परिक्षक, नवी मुंबई, वाशि/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद /नागपूर.

१२) मुख्य अभियंता, विद्युत विभाग, महाराष्ट्रशासन, प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

१३) अवर सचिव (उर्जा -३) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.३२

१४) विभागीय आयुक्त (सर्व)

१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

१७) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

१८) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग (वित्त -१, वित्त- ७, वित्त -८)

१९) कक्ष अधिकारी (रोखशाखा), ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.

२०) वित्त विभाग (अर्थसंकल्प १६ / व्यय१५) मंत्रालय, मुंबई.३२.

२१) निवडनस्ती ,पंरा -४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र. सीजीटी २६०८/प्र.क्र. ७७०८/पंरा-४ (११), दिनांक २० डिसेंबर, २००८.

३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रक्मा देणे. २०० - इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रक्मा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० %अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत) (मागणी क्र. एल -५)

( रु. लाखात )

| अ. क्र. | जिल्हा | रुपये अंकात | रुपये अक्षरी |
|---|---|---|---|
| १ | २ | 3 | ४ |
| १ | ठाणे | १८९.६६ | (रुपये एक कोटी एकोणनव्वद लक्ष सहासष्ट हजार फक्त ) |
| २ | रायगड | २१३.०८ | (रुपये दोन कोटी तेरा लक्ष आठ हजार फक्त ) |
| ३ | रत्नागिरी | ५९.५० | (रुपये एकोणसाठ लाख पन्नास हजार फक्त ) |
| ४ | सिंधूदुर्ग | ५५.५७ | (रुपये पंचावन्न लाख सत्तावन्न हजार फक्त ) |
| ५ | अहमदनगर | २८६.५० | (रुपये दोन कोटी अड्डुसष्ट लाख पन्नास हजार फक्त ) |
| ६ | धुळे | ८२.५० | (रुपये ब्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त ) |
| ७ | नंदूरबार | ७२.०५ | (रुपये बहात्तर लाख पाच हजार फक्त ) |
| ८ | जळगांव | ४०८.९३ | (रुपये चार कोटी आठ लक्ष त्र्याण्णव हजार फक्त ) |
| ९ | नाशिक | २१२.५० | (रुपये दोन कोटी बारा लक्ष पन्नास हजार फक्त ) |
| १० | कोल्हापूर | ३१९.४८ | (रुपये तीन कोटी एकोणीस लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त ) |
| ११ | सांगली | १९७.८४ | (रुपये एक कोटी सत्त्याण्णव लाख चौ-याऐंशी हजार फक्त ) |
| १२ | सातारा | २४६.५८ | (रुपये दोन कोटी शेहेचाळीस लाख अठ्ठावन्न हजार फक्त ) |
| १३ | सोलापूर | ३७७.१४ | (रुपये तीन कोटी सत्त्याहत्तर लाख चौदा हजार फक्त ) |
| १४ | पुणे | २१६.६४ | (रुपये दोन कोटी सोळा लाख चौसष्ट हजार फक्त ) |
| १५ | औरंगाबाद | ९६.५६ | (रुपये शहाण्णव लाख छपन्न हजार फक्त ) |
| १६ | जालना | ३१.९७ | (रुपये एकतीस लाख सत्त्याण्णव हजार फक्त ) |
| १७ | परभणी | १७३.३४ | (रुपये एक कोटी त्र्याहत्तर लाख चौतीस हजार फक्त ) |
| १८ | हिंगोली | ११०.६८ | (रुपये एक कोटी दहा लाख अड्डुसष्ट हजार फक्त ) |
| १९ | बीड | १५५.५० | (रुपये एक कोटी पंचावन्न लाख पन्नास हजार फक्त) |
| २० | लातूर | १२४.९७ | (रुपये एक कोटी चोवीस लाख सत्त्याण्णव हजार फक्त ) |
| २१ | नांदेड | १६६.०७ | (रुपये एक कोटी सहासष्ट लाख सात हजार फक्त ) |
| २२ | उस्मानाबाद | ९९.३८ | (रुपये नव्व्याण्णव लाख अडतीस हजार फक्त ) |
| २३ | अकोला | ८२.२८ | (रुपये ब्याऐंशी लाख अठ्ठावीस हजार फक्त ) |
| २४ | वाशिम | १३७.६४ | (रुपये एक कोटी सदतीस लाख चौसष्ट हजार फक्त ) |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | अमरावती | १६०.३७ | (रुपये एक कोटी साठ लाख सदतीस हजार फक्त ) |
| २६ | बुलढाणा | १४६.३३ | (रुपये एक कोटी शेहेचाळीस लाख तेहतीस हजार फक्त ) |
| २७ | यवतमाळ | १७४.५० | (रुपये एक कोटी चौ-याहत्तर लाख पन्नास हजार फक्त ) |
| २८ | भंडारा | ६६.०० | (रुपये सहासष्ट लाख फक्त ) |
| २९ | गोंदिया | ६०.३५ | (रुपये साठ लाख पस्तीस हजार फक्त ) |
| ३० | चंद्रपूर | १९७.५५ | (रुपये एक कोटी सत्त्याण्णव लाख पंचावन्न हजार फक्त ) |
| ३१ | गडचिरोली | १०४.०० | (रुपये एक कोटी चार लाख फक्त ) |
| ३२ | वर्धा | १०५.४० | (रुपये एक कोटी पाच लाख चाळीस हजार फक्त ) |
| ३३ | नागपूर | २०९.९७ | (रुपये दोन कोटी नऊ लाख सत्त्याण्णव हजार फक्त ) |
| | सर्व एकूण | ५३४०.८४ | (रुपये त्रेपन्न कोटी चाळीस लाख चौ-याऐंशी हजार फक्त ) |

( प्र. वि. पाटील )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

अर्थसंकल्पीय अनुदान सन २००८-२००९
२६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे.
२००- इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०५)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १००% अनुदान (२६०४०३२५) (दत्तमत) (मागणी क्र. एल -५)

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र. वीजीटी २६०८/प्र.क्र. ४४१८ /पंरा-४(२२)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक- १० फेब्रुवारी, २००९.

संदर्भ :-१) शासन निर्णय,ग्राम विकास विभाग क्र.वीजीटी २६०८/सीआर ४४१८/ पंरा -४ (२२ ), दि.- २० डिसेंबर, २००८

शुध्दीपत्रक -

संदर्भिय शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात अ.क्र. ५ मध्ये अक्षरी " रुपये दोन कोटी अडुसष्ट लाख पन्नास हजार फक्त " याऐवजी " रुपये तीन कोटी अठ्ठ्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त "असे वाचावे. तसेच अ.क्र. १२ मध्ये अंकात रुपये " ३७७.१४ " च्या ऐवजी "३७७.५५ " आणि अक्षरी रुपये " तीन कोटी सत्याहत्तर लक्ष चौदा हजार फक्त " च्या ऐवजी "तीन कोटी सत्याहत्तर लाख पंचावन्न हजार फक्त " असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र. वि. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ०२०,
वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.( ३ प्रती )
प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

G:\CR 4498 STREET LIGHT.lwp